# बांधकामास मंजूरी

नांव-(१) अखतर अली अकबर अली (२) ताहीर अली इमरान अली (३) रेहाना इमरान अली (४) जाहीद अकबर अली रा.वर्धा

यांचा तारीख : ११/११/२०१३ रोजी बांधकामास परवानगी मिळणे करीता केलेला अर्ज.

तारीख १२ / ५ /२०१४
वनप/बांधकाम/ ३१४८
वर्धा नगर परिषद कार्यालय
दिनांक :- १२/५/२०१४

## -: वर्धा नगर परिषद, वर्धा :-

## प्रारंभ प्रमाणपत्र

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९(४) अन्वय याद्वारे

१) अखतर अली अकबर अली (२) ताहीर अली इमरान अली (३) रेहाना इमरान अली (४) जाहीद अकबर अली रा.वर्धा प्लॉट नं.१०८ ते ११७ सर्वे नं.१६ वर्धा नगर पालिकेच्या हद्दितील तुमचे मालकीच्या कबज्यातील नगर पालिकेच्या हद्दितील तुमचे मालकीचे जागेत PA. लाल रंगीत प्लॅनमध्ये दुरुस्ती दाखविले प्रमाणे भुखंड क्षेत्रफळ २०१३.४९ चौ.मी. असे एकुण २४१५.४६ चौ.मी. रहीवासी इमारत बांधकाम परवानगी

पुढील शर्तीस अधीन राहून बांधकामास परवानगी देण्यात येत आहे.

## -: अटी :-

१) हे प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्ष पर्यत वैध असेल त्यानंतर स्वत:ला अर्ज करुन नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.
२) सदर्हु बांधकामामुळे नगर पालिकेच्या डेव्हलपमेंट प्लॅन मध्ये अगर कोणत्याही सार्वजनिक कार्यास अडथळा निर्माण झाल्यास तुमच्या खर्चाने काढून घ्यावे लागेल त्याबद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही.
३) बांधकाम मंजूर केलेल्या प्लॅन प्रमाणे आणि दिलेल्या अटी प्रमाणे करावे.
४) प्लॉट बाजूचे हद्दीपासून आणि मागील बाजूने नकाशात दाखविल्या प्रमाणे अंतर सोडावे.
५) बांधकामास कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये तसे केल्यास आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.
६) प्लॉट एरियाच्या क्षेत्रापेक्षा जास्त जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
७) ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे त्या जागेसंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधीची संपूर्ण जबाबदारी तुमचेवर राहील.
८) बांधकामाचे मटेरिअल सार्वजनिक रस्त्यावर अथवा नगरपालिकेच्या लेखी परवानगी शिवाय टाकू नये तसे आढळून आल्या कायदेशीर कारवाही करण्यात येईल.
९) रस्त्याचे सपाटीपासून इमारतीच प्लींथ २ फुट पेक्षा जास्त असावी.
१०) बांधलेल्या जागेत भरपूर हवा उजेड व स्वच्छता राहील अशा तऱ्हेने सोय असावी. त्याबाबतची योग्य ती खबरदारी घ्यावी.
११) बांधकाम पक्क्यास्वरुपाचे असावे बांधकामामध्ये हलक्या जातीचे मटेरियल गवत/पांगारा वगैरे वापरु नये.
१२) इमारतीचे सांडपाणी इतरत्र न सोडता नगरपालिकेची गटार असल्यास नगरपालिकेचे गटरीस नगरपालिकेची परवानगी घेऊन सोडावी गटार नसल्यास स्वत:चे मालकाचे जागेतच सोकपीट बांधून ही व्यावस्था करावी.
१३) बांधलेल्या जागेचा उपयोग फक्त राहण्यासाठीच/दुकानासाठी/कारख्यान्यासाठीच/धान्य दळण्याचे गिरणीसाठी करावा.
१४) ही बांधकामाची परवानगी एक वर्ष चालू राहील मुदतीत बांधकाम पूर्ण न झाल्या परवानगीची मुदत वाढवून न घेतल्यास सदरची परवानगी रद्द झाली असे समजावे.
१५) मंजूर प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे त्या व्यतिरिक्त जादा बांधकाम अथवा कोणतेही बदल केल्यास निदर्शनास आले तर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
१६) घरात जाणे येणे करिता नगरपालिकेचे गटार वर स्लॅब टाकने, तो गटाराचे रुंदी इतका व तीन फुट लांब असा, नगर पालिके चा रस्ता अगर सडक यांचे लेव्हल बरोबर घालावा. जास्त वर येता कामा नये याबाबत अलग रितसर परवानगी घ्यावी.
१७) सदर्हु प्लॉटमध्ये कमीत कमी नविन चार झाडे लावावी व सदर झाडे जतन करावी त्याशिवाय बांधलेल्या जागेच्या वापर सुरु करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.
१८) बांधकाम पूर्ण झाल्यावर बांधकाम पूर्णतेचा दाखला घेतल्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करु नये तसे आढळून आल्यास महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कारवाही करण्यात येईल.
१९) बांधकाम करते वेळी फ्लॅश ऍश विटा व साहित्याचा वापर करणे बंधनकारक राहील अन्यथा बांधकाम परवानगी नाकारण्यात येईल.
२०) कोणत्याही परिस्थितीत बांधकाम बंद करण्याचा अगर चालू ठेवण्याचा अधिकार नगरपालिकेने राखून ठेवला आहे.
२१) सदर भुखंडाचे एकुण मोजमापाबाबत व हद्दी बाबतीत सर्वस्व जबाबदारी आपली राहील.

२२) बांधकाम सोबतचे मंजूरी नकाशाप्रमाणे चौ. मी. क्षेत्रातच असावे. मंजूरी व्यतिरिक्त बांधकाम करु नये जादाचे बांधकाम करावयाचे झाल्यास मंजरी घेऊनच करावे. अन्यथा परवानगीशिवाय अथवा परवानगी दिलेल्या पेक्षा जादा जागेत बांधकाम केल्यास महा. प्रादेशिक नगररचना अधि. १९६६ चे कलम ५२ व ५३ नुसार नगरपरिषदेमार्फत कार्यवाही केली जाईल.

२३) शेजाऱ्याचे जागेवर रस्त्याचे बोळ गटार त्यावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्याची तसे बांधकाम पाहून घ्यावे लागेल.

२४) आवार भिंत बांधकामास शेजाऱ्याचे, शासकीय जागेकडे दारे खिडक्या गटारचा इतर ओपनिंग ठेवू नये तसेच आवार भिंतीची उंची १.३ मिटर पेक्षा उंच वाढवू नये वा ठेवू नये.

२५) आपल्या घराचे सांडपाण्याची रितसर व्यवस्था आपण करावी व त्यापासून कुणाला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२६) इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर बांधकाम पूर्ण झाल्याचे पूर्वत्वाचे (सि.सि.) प्रमाणपत्र प्राप्त करुनच ईमारत उपयोगी आणावी.

२७) बांधकाम मटेरियल पासून शेजाऱ्याला किंवा रहदारीस त्रास होणार नाही याची काळजी म्हणून रस्त्यावर मटेरियल राहणार नाही अन्यथा न.प. मार्फत कधीही मटेरियल जप्त करता येईल.

२८) संडासाचे बांधकाम करतांना संडासाचे पाईप थेट नगरपालिकेच्या नालीला जोडी नये.

२९) आपणांकडून दस्ताऐवजावर परवानगी दिल्यानंतर कोणत्याही जमिनीबाबत आक्षेप आल्यास व वाद निर्माण झाल्यास, आपले सुरु असलेले काम बंद करावे लागेल आणि होणा-या न्यायालयीन प्रकरण व इतरत्र बाबीस नगरपालिका जबाबदार राहणार नाही. आपली वैयत्तीक जबाबदारी राहील.

३०) नियमित बांधकाम भूकंप रोधक करण्याचे दृष्टीने आपणांस बांधकाम चालू करण्यापूर्वी सक्षम स्थापत्य अभियंताकडून भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे सादर करणे बंधनकारक राहील आणि तसेच आर.सी.सी. डिझायनर कडून कॉलम बिम व स्लॅबचे डिझाईन ( भूकंम रोधक ) करुनचे सक्षम स्थापत्य अभियंताच्या देखरेख खाली स्लॅब व इतर बांधकाम पूर्ण करावे लागेल.

३१) भूकंप रोधक आणि पक्के बांधकाम करण्यासाठी आपले बांधकाम सादर केलेले नकाशे व आराखडयानुसार आणि भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतूदी नुसार स्थपत्या अभियंत्याच्या देखरेखी खाली बांधकाम पूर्ण केल्याचा दाखला देण्यात येईल.

३२) पावसाचे पाणी साठवण्यासाठी तज्ञ व्यक्तीकडून आहे त्या जागेत व्यवस्था करुन या कार्यालयाला कळवावे. अन्यथा नकाशा दुरुस्ती करुन पावसाचे पाणी साठवण्यासाठी व्यवस्था करुन पुन्हा नकाशाला परवानगी घेणे बंधनकारक आहे.

३३) वरील प्रमाणे अटी व शर्तीची पूर्तता न केल्यास भूकंपाचे वेळी व कच्चे बांधकाम केल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे व सदर बांधकामामूळे दुर्घटना होवून कोणतीही जिवित किंवा वित्तहाणी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहील.

३४) बांधकामाचे मटेरिअल रोडचे मध्ये टाकु नये व यासाठी भरलेले चार्जेस फक्त ६० दिवसापूरतेच ग्राह्य राहील.

या वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंगन झाल्यास किंवा निदर्शनास आल्यास आपणांस दिलेले बांधकाम अवैध समजण्यात येईल. आणि आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल. त्याकरिता सर्व अटीचे पालन करण्याच्या शर्तीवरच आपणांस बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

ठिकाण : वर्धा
दिनांक :२१/५ /२०१४

मुख्याधिकारी
नगर परिषद, वर्धा.

प्रतिलिपी :

१) झोन अभियंता, नगर परिषद वर्धा.

उपरोक्त दिलेली परवानगी श्री. ...................................................................... यांनी सादर केलेल्या नकाशा व आराखडयानुसार सक्षम अभियंताच्या देखरेखीखाली भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतूदीनुसार चांगल्या प्रतिचे साहित्य वापरुन बांधकाम करीत असल्याबाबत दर १५ दिवसाला भेट देवून खात्री करुन घ्यावी आणि भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतूदीनुसार बांधकाम होत नसल्यास संबंधीताचे बांधकाम बंद करुन पून्हा मानक संस्थेने दिलेल्या तरतुदी नुसार जबाबदारीने दुरुस्ती करुन घ्यावी.

२) कर अधिक्षक, नगर परिषद वर्धा.

नविन बांधकामाची प्रत्यक्ष तपासणी करुन नियमानुसार नोंद घेवून कर आकारणीची कारवाई करावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद,वर्धा